Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा उदय व विकास

**डॉ. निता जगताप**
इतिहास विभाग
अप्पासाहेब जेधे कॉलेज, पुणे

**प्रास्ताविक :-**

17 व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्यानंतर संपूर्ण जगभर क्रांती होण्यास सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणात कच्चा मालाची आवश्यकता व पक्का माल विकण्यासाठी इंग्लडने अमेरिका, आशिया, आफ्रिका खंडात वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली. भारतातील मोगलाची अस्थिर सत्ता यांचा फायदा घेऊन अनेक सवलती मिळविल्या होत्या.

1757 च्या प्लासीच्या युध्दात नंतर राजकीय सत्ता स्थापन करुन व्यापार हातात घेण्यास सुरुवात केली. प्रामुख्याने महाराष्ट्र्ात पेशव्याच्या साम्राज्याचा शेवट झाल्यानंतर अनेक सरदाराच्या पदरी असलेले सैनिक परत शेताकडे परतले होते. महाराष्ट्रतील दुष्काळ, पाऊस यामुळै शेतीचे मोठे नुकसान होत असे. बेकारी, गरीबीमध्ये वाढ झालेली दिसून येते. महाराष्ट्र्ात आर्थिक परिस्थिती मधून कामगार वर्ग उदयाला आलेला दिसून येतो.

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर छोटे उद्योग चालू होते. परंतु त्यामुळे कामगाराचा प्रश्न निर्माण झाला नाही. परंतु औद्योगिक क्रांती नंतर उत्पादनाचे तंत्र बदलले होते. तसेच ब्रिटीश सरकारच्या कर योजनेमूळे अनेक स्थानिक उद्योग-धंदे बंद पडले होते. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र्ात अनेक उद्योग सुरु झाले होते. औद्योगिकीकरणामुळे गावातील अनेक तरुण नोकरी करण्यासाठी शहराकडे आले

त्यातून कामगार वर्गाचा उदय झालेला दिूसन येतो. अनेक समस्याचा अभ्यास पुढील उद्दिष्टांच्या साहाय्याने करणे.

1. कामगार वर्ग उदयाला येण्याची कारणे.

2. कामगार चळवळीचा उगम

3. कामगार चळवळीच्या समस्या स्पष्ट करणे.

**संशोधन लेखाचे गृहितके :-**

महाराष्ट्र्ातील कामगार चळवळ व तिच्यापुढील समस्या या लेखात महाराष्ट्र्ातील कामगार वर्ग प्रामुख्याने वंचित असलेला घटक असून त्याचा विविध अंगाने अभ्यास करण्यावर भर दिलेला आहे.

**संशोधन पध्दती :-**

महाराष्ट्र्ातील कामगार चळवळ व समस्या या संशोधन इतिहास व विश्लेषण संशोधन पध्दतीचा अवलंब केला. यासाठी विविध ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके व इंटरनेटचा उपयोग करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र्ात कामगार वर्ग उदयाला येण्याची कारणेः-**

1) इंग्रजांनी विदर्भ, मराठवाड्यातून कापड उद्योगासाठी आवश्यक असणारा कापूस आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर दळणवळणाची साधने निर्माण करण्यास सुरुवात केली. रस्त्याची कामे व रेल्वे कामासाठी कामगारांची गरत निर्माण झाली व त्यातून कामगार वर्ग उदयाला आला.

2) भारतात व महाराष्ट्र्ात रेज्वे इंजिन वाफेवर चालणारे होते त्यामुळे कोळशाची आवश्यकता निर्माण झाली. अनेक कोळशाच्या खाणीमधून कोळसा बाहेर काढण्यासाठी हजारो कामगाराची गरज भासू लागली. त्यातून नवीन कामगार वर्ग निर्माण झाला.

3) महाराष्ट्ात मोठ्या प्रमाणावर कापूसावर प्रक्रिया करण्यासाठी ब्रिटीशांनी जिनींग प्रेसची निर्मिती केली.

**कामगारांच्या निर्माण समस्या :-**

महाराष्ट्ामध्ये इंग्रजानी मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास केला. साहजिक मोठा कामगार वर्ग निर्माण होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या.

बहुतेक कारखान्यांत मजूरांना कमी वेतनावर काम करावे लागे. बहुतेक कारखान्यात 12 ते 14 तास काम करुन घेतले जात असे. कामगारांना योग्य प्रमाणात मोबदला मिळत नव्हता. तसेच बालकामगारांना सुध्दा कमी वेतन दिले जात होते. ठेकेदार कामगारांचा पैसा लुटत हाता त्यामुळे कामगारांच्या समस्यामध्ये वाढ होत होती. स्त्री कामगाराची अवस्था अत्यंत वाईट होती.

**कामगार चळवळीचा उदय :-**

कामगार वर्गात वाढत असलेल्या असंतोषाला वाचा फोडण्यासाठी उद्देशाने नारायण मेघाजी लोखंडे यांनी सर्वप्रथम दीनबंधमधून कामगाराच्या समस्या मांडण्यास सुरुवात केली. इ.स.1890 मध्ये त्यांनी पुढाकार घेऊन भारतात पहिली कामगार चळवळ सुरु केली.ब्रिटीश सरकारने मुंबईतील गिरणीवर मोठ्या प्रमाणात बंधने घालण्यास सुरुवात केली. तसेच अनेक विविध प्रकारचे कायदे करुन मंजुरीचे दर कमी करण्यास सुरुवात झालेली दिसून येते. तसेच अमेरिका व ईजिप्त मधील धागावर 5% आयात शुल्क बसविण्यात आले. त्यामुळे मालकांना फटका बसण्यास सुरुवात झाल्यानंतर कामगारांवर उपासमारीची वेळ येण्यास सुरुवात झाली.

या सर्व कारणामुळे मुंबईत 1890 मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली पहिली गिरणी कामगार संघटना स्थापन करण्यात आली. बॉम्बे फॅक्टरी

कमिशनला अनेक निवेदने देण्यात आली. कामगाराच्या अनेक मागण्या मंजूर करण्यात येऊ लागल्या.

**अनुमान :-**

महाराष्ट्र्ात कामगार चळवळीने जोम धरल्याने किमान वेतन निश्चिती, कामगार मालक सांमजस्य, कामगार कल्याण योजना, सामाजिक सुरक्षितता या गोष्टी व्यापक गतिमान झालेल्या दिसून येतात. मुंबईत स्वातंत्र्यानंतर राजकिय पक्षानी हस्तक्षेप करुन या कामगार संघटना मोडून काढलेल्या दिसून येतात.

**संदर्भ सूची**

1) वेगवेगळे सरकारी अहवाल.

2) 19 व्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास :- डॉ.अरुणा मोरे

3) आधुनिक भारताचा इतिहास :- प्राचार्य डॉ.जी.बी.शहा.